अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## दिल्लीने अखेरच्या बॉलमध्ये मारली बाजी

**नवी दिल्ली :** दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात टायटन यांच्यात अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या रोमहर्षक सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने ४ रन्सनी विजय मिळवला. राशीद खानने केलेल्या फटकेबाजीमुळे एकवेळ हातातून सुटलेल्या सामन्यात संघाने पुन्हा कमबॅक केला होता, मात्र अखेरच्याक्षणी दिल्लीने बाजी मारली. दिल्लीकडून कर्णधार ऋषभ पंतने नाबाद ८८ धावा करत दिल्लीच्या विजयात मोठं योगदान दिलं.

दिल्लीच्या विजयात कर्णधार ऋषभ पंतचं मोठं योगदान राहिलं, त्याने ८८ धावांची नाबाद खेळी केली. पंतने ८ षटकार आणि ५ चौकार ठोकले. अक्षर पटेलने ६६ आणि ट्रिस्टन स्टब्सने ७ चेंडूत नाबाद २६ धावा केल्या. गुजरातकडून डेव्हिड मिलर आणि साई सुदर्शन यांनी उत्कृष्ट अर्धशतके झळकावली. सुदर्शनने ६५ धावांची खेळी केली. डेव्हिड मिलरने ५५ धावा केल्या. शेवटी राशिद खानने ११ चेंडूत नाबाद २१ धावा केल्या मात्र तो संघाला विजय मिळवून देण्यात अयशी ठरला. गुजरात टायटन्सला शेवटच्या षटकात १९ धावांची गरज होती. दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंतने मुकेश कुमारला अखेच षटक दिलं. राशिद खानने मुकेश कुमारच्या पहिल्या दोन चेंडूवर चौकार ठोकत सामन्यात पुन्हा जीव आणला. मात्र यानंतर मुकेश कुमारने सलग दोन डॉट बॉल टाकत दिल्लीला दिलासा दिला. मात्र त्यानंतर राशिद खानने पाचव्या चेंडूवर षटकार ठोकत सामना पुहा रोमहर्षक बनवला.



# संजय क्षीरसागरांच्या पाठीशी पूर्ण ताकदीनिशी उभे राहू : शरद पवार

## पक्षप्रवेशाची निनादली तुतारी | क्षीरसागर गटाची परिवर्तनवादी राजकारणाची नवी इनिंग

**सोलापूर/प्रतिनिधी**

संजय क्षीरसागर यांनी जनतेत जाऊन काम करावं, त्यांच्या पाठिशी पूर्ण ताकदीनिशी आपण उभे राहू. त्यांना निश्चित यश मिळेल, असे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आज येथे सांगतानाच माढा लोकसभा मतदारसंघांमध्ये धैर्यशील मोहिते-पाटील व सोलापूर लोकसभा मतदारसंघांमध्ये प्रणिती शिंदे यांना आमचा पाठिंबा असून दुधात साखर म्हणून संजय क्षीरसागर यांनी त्यांचा भाजपचा रस्ता सोडून राष्ट्रवादीचा रस्ता धरला आहे, असे ते म्हणाले.

मोहोळ येथील श्रीराम मंगल कार्यालयात नेते संजय क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला. यावेळी व्यासपीठावर माढ्याचे उमेदवार धैर्यशील मोहिते -पाटील, उत्तम जानकर, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, ॲड. पवन गायकवाड, विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील, शरद पवार राष्ट्रवादी गटाचे तालुकाध्यक्ष विनय पाटील आदी उपस्थित होते. खासदार पवार पुढे बोलताना म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने, मी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये हिंडत आहे. हे मोदी सरकार शेतकऱ्यांच्या विरोधी आहे बेकारी कमी करण्यासाठी ठोस पावले टाकली जात नाहीत उपेक्षित घटकांकडे लक्ष देण्याची जबाबदारी हे सरकार पार पाडत नाही. मोदी सरकार व मोदींचा पक्ष महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातून बाजूला कसा काढता येईल यासाठी माझे राज्यभर दौरे सुरू आहेत असेही त्यांनी सांगितले. मी राज्यातील अनेक जिल्ह्यात दौरे केले यावेळी लोकांची मनस्थिती भाजपच्या हातातून सत्ता काढून घ्यायची दिसत आसल्याचे ही खासदार पवार शेवटी बोलताना म्हणाले.



मोहोळ : संजय क्षीरसागर यांच्या पक्षप्रवेश सोहळ्यात मार्गदर्शन करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार.



### थेट प्रवेश सोहळ्यातून...

- मोहोळ तालुक्यातील संजय क्षीरसागर गटाच्या समर्थकांची कार्यक्रम ठिकाणी हजारोंच्या संख्येने मांदियाळी
- मोहोळ तालुक्यातील शरद पवार प्रेमीदेखील कार्यक्रमास आवर्जून उपस्थित
- संजय क्षीरसागर यांची भाजपवर सडकून टिका करताना या पक्षाच्या नेतेमंडळींवर गंभीर आरोप
- क्षीरसागरांच्या पक्ष बदलाच्या भूमिकेने समर्थकांमध्ये आनंद आणि उत्साह संचारल्याचं दिसलं चित्र
- शरद पवार हे क्षीरसागरांबद्दल काय बोलतात, याबद्दल होतं मोठं औत्सुक्य
- क्षीरसागरांच्या राष्ट्रवादी प्रवेश सोहळ्याला मोहोळ तालुक्यातील १०४ गावांमधून समर्थकांची हजेरी
- क्षीरसागर यांची गटाच्या शक्तीप्रदर्शनाची कार्यक्रमानंतर तालुक्यात रंगली चर्चा

संजय क्षीरसागर यावेळी बोलताना म्हणाले, मी गेल्या अनेक वर्षांपासून निष्ठेने प्रामाणिकपणे भाजपचे तळागाळात जाऊन काम केले. परंतु, सोलापूर जिल्ह्यातील काही भाजपच्या नेत्यांनी मला डावले मला थांबवण्याचा प्रयत्न केला. मी भाजपचे काम करत असताना वेळोवेळी माझे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात मी वरिष्ठांकडे तक्रारही केली. परंतु, त्यांनी मला तेवढ्या गांभीर्याने घेतले नाही मी भाजपच्या कोणत्याही लाभात नाही त्यामुळे मला कशाची भीती नाही.

यापुढील काळात खासदार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शरदचंद्र पवार गटाचे काम प्रामाणिकपणे करून समाजातील तळागाळातील सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही शेवटी क्षीरसागर म्हणाले. यावेळी सतीश पाटील, मधूकर सिरसट, अरविंद माने, डॉ. बाळासाहेब वाघमोडे, विक्रांत दळवी, बाळासाहेब वाघमोडे, किशोर पवार, अंजली वस्त्रे, विक्रम देशमुख, मंगेश पांढरे, आबा कांबळे, रियाज शेख, इरफान पाटील, आदींसह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अवघ्या दीड दिवसात नेटकं नियोजन

शरद पवार यांचा मोहोळ दौरा निश्चित झाला तेव्हा क्षीरसागर गटाच्या प्रवेश सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी अवघे दीड दिवस मिळाले. क्षीरसागर यांच्यासह त्यांच्या समर्थक शिलेदारांनी दिवस-रात्र झटून या कार्यक्रमाचं नेटकं नियोजन केलं. नियोजनाबद्दल राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी कौतुक केलं.

### क्षीरसागरांच्या जहाजाला मिळाला किनारा

मागील २५ वर्षे संजय क्षीरसागर हे भाजपमध्ये होते. अत्यंत निष्ठेने ते कार्यरत होते. मात्र, या पक्षात त्यांचं खच्चीकरण झालं. मोहोळ तालुक्याचा विकास करण्याच्या संदर्भात त्यांचे जहाज गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्ता असतानाही किनारी येऊच दिले नाही. मात्र क्षीरसागर यांनी शरद पवार गटात प्रवेश केल्यानंतर क्षीरसागर यांच्या डळमळत्या जहाजाला खऱ्या अर्थाने किनारा मिळाला असून शरद पवार गटाची त्यांच्या नेतृत्वाला मिळालेली ऊर्जा तालुक्याच्या विकासासाठी त्यांच्या आमदारकीसाठी निश्चित उपयोगी पडेल, असे राजकीय जाणकार सांगत आहेत.

---

# तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी विरोधकांच्या तुतारीची फुकारी करतील

### आमदार शहाजी पाटलांची मोहिते-पाटलांवर सडकून टीका

**सांगोला/प्रतिनिधी**

रामायण, महाभारत संपेल पण मोहिते-पाटील आणि शहाजी पाटील यांचा इतिहास संपणार नाही. मोहिते-पाटलांनी ५० वर्षे सांगोला तालुक्याचं नीरा उजवा कालव्याचं पाणी अडवलं. गेल्या पाच वर्षात टेंभू, म्हैसाळ, नीरा उजवा कालवा या सिंचन योजनेचे पाणी आले आहे. ऐन उन्हाळ्यात कोयना धरणातून पहिल्यांदा माण नदीत सोडले आहे. ५५ वर्षे भोगलेल्या दुष्काळाच्या झळा काळजात असतील तर या तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी विरोधकांच्या तुतारीची फुकारी केल्याशिवाय राहणार नाहीत अशी टीका आमदार शहाजी पाटील यांनी केली.


माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचारार्थ बुधवारी सांगोला तालुक्यात खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, आमदार शहाजी पाटील, माजी आमदार दीपक साळुंके पाटील, आमदार जयकुमार गोरे, भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर सभा पार पडली.

आमदार शहाजी पाटील म्हणाले, पवारांना, विजयदादांना निवडून दिलं, काय काम केले ते दिसले नाही.



नीरा उजवा कालवा सिंचन योजनेतून एक टीएमसी पाणी वाढवून दिले आहे. गेल्या वर्षीच्या खरीप हंगामातील नुकसानीचे अनुदान शेतकऱ्याला मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मोहिते पाटील पाण्यासाठी सांगोल्याला पैसे देणार नाहीत, तुतारी घात करील. ज्यांनी ५० वर्षे सांगोल्याला पाणी मिळू दिले नाही तेच मोहिते पाटील निवडणुकीत मते मागत आहेत. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी साथ दिली आहे. उजनीचं पाणी नेलं तर रक्तरंजीत क्रांती केली जाईल असा इशारा दिला होता म्हणून उजनीचं दोन टीएमसी पाणी मिळणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

उमेदवार खासदार रणजितसिंह निंबाळकर म्हणाले, पवार साहेबांनी निवडून आल्यानंतर इथल्या योजना, पाणी, रस्ते, योजना, रोजगार बारामतीला गेला, म्हणून पवारांच्या भूमिकेचा तिटकारा आला.पवारांशी लढून पाणी आणावं लागलं. पवारांनी मावळत्या सूर्याची शपथेने तालुका दुष्काळमुक्त करण्याचा शब्द दिला होता. सूर्य देखील मावळला आणि ते देखील मावळले.



खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी रस्ते, पाण्यांसह विविध विकास कामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. सांगोल्याला पाण्यासाठी ५० वर्षे संघर्ष करावा लागला. खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी पाण्याचा प्रश्न सोडवून न्याय दिला. सांगोला तालुक्याच्या विकासासाठी आमदार शहाजी पाटील यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी आणला आहे.

– **दीपक साळुंके**, माजी आमदार

---

### सोलापूर मतदार संघात नवा ट्विस्ट

# अतिश गायकवाडांना 'वंचित'चा पाठिंबा

**सोलापूर/प्रतिनिधी**

बहुचर्चित सोलापूर लोकसभा मतदार संघात नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे. अपक्ष उमेदवार आतिश गायकवाड यांना वंचित बहुजन आघाडीनं पाठिंबा दिला आहे. त्यातून वंचित आघाडी पुरस्कृत उमेदवार पुन्हा या मतदार संघात असणार आहे. यापूर्वी वंचितनं दिलेल्या राहुल गायकवाड या उमेदवाराने परस्पर निवडणुकीतून माघार घेत काँग्रेसमध्ये प्रवेश केला.



दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर, वंचित बहुजन आघाडीबद्दल श्रद्धा आणि प्रेम असणाऱ्यांनी प्रचंड संताप व्यक्त केला. परिणामी वंचित बहुजन आघाडीमध्ये हालचाली झाल्या असून पक्षाचा उमेदवार असायलाच हवा, असा मतप्रवाह पुढे आल्यानं आतिश गायकवाड या अपक्ष उमेदवाराला वंचितने पाठिंबा दिला आहे. सोलापूर लोकसभा निवडणुकीसाठी अपक्ष म्हणून उमेदवार असलेले आतिश मोहन बनसोडे या आक्रमक युवा चेहऱ्याला वंचितने पाठिंबा दिला आहे. वंचित बहुजन आघाडीच्या ट्विटर पेजवर याबाबत घोषणा केली असून गुरुवारी वंचित बहुजन आघाडीकडून अधिकृत घोषणा होणार आहे. वंचित बहुजन आघाडीने या निवडणुकीतून माघार घेतल्याने काँग्रेस पक्षाची ताकद वाढल्याचे बोलले जात होते परंतु प्रकाश आंबेडकर यांनी अपक्ष उमेदवार आदेश बनसोडे यांना पुरस्कृत केल्याने निश्चितच काँग्रेसची डोकेदुखी वाढणार आहे.

### आता पुढे काय?

२०१९ ला वंचित आघाडीचे नेते डॉ. प्रकाश आंबडेकर यांनी सोलापूर लोकसभेतून निवडणूक लढविली होती. त्यावेळी त्यांना साधारण पावणेदोन लाखाचं मताधिक्य मिळालं होतं. या खेपेस पहिल्यांदा पक्षानं दिलेल्या उमदेवारानंतर माघार घेतल्यानंतर अपक्ष आतिश गायकवाड यांना वंचितनं पुरस्कृत केलं आहे. मात्र, आतिश गायकवाड यांच्यासाठी वंचित ताकद लावणार का? डॉ. आंबेडकर प्रचार सभा घेणार का? हे महत्त्वाचे आहे. अपक्ष उमेदवाराला पुरस्कृत करुन वंचित शांत राहणार का? याबद्दलची चर्चा आहे. या मतदार संघात वंचितची मते अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. काँग्रेस आणि भाजप यापैकी कोण जिंकणार ? त्यासाठी वंचितच्या उमेदवाराला मिळणाऱ्या मतांचं गणित महत्त्वाचं असणार आहे.

---

# बारामतीच्या पवारांना शहाणा बाप कसं म्हणायचं?

## नाईक- निंबाळकरांनी साधला शरद पवारांवर निशाणा; सांगोला तालुक्यात प्रचार सभा

**सांगोला/प्रतिनिधी**

पवार साहेब राजकारणातले जाणते नेते असतानाही त्यांनी या मातीत निवडून आल्यानंतर इथल्या योजना, पाणी, रस्ते, योजना, रोजगार बारामतीला गेला, म्हणून शरद पवारांच्या भूमिकेचा तिटकारा आला. पवारांशी ताकदीने वाद घालून, त्यांच्याशी लढून पाणी आणावं लागलं. नीरा देवधरच्या पाण्यासाठी आम्ही त्यांच्या कानात गेलो आणि हत्ती बसवला. ज्या वेळेस इस्टेटीची वाटणी होते त्यावेळी एकाच पोराला सगळी इस्टेट दिली तर त्याला शहाणा बाप कोण म्हणेल का. तसंच बारामतीच्या पवारांना शहाणा बाप कसा म्हणायचं अशा तीव्र शब्दात भाजपचे उमेदवार खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी पवारांवर निशाणा साधला.

माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचारार्थ बुधवार २४ एप्रिल सांगोला तालुक्यातील चिकमहुद, कटफळ, खवासपूर, लोटेवाडी, एखतपूर, अजनाळे, वाटंबरे, नाझरे, बलवडी, चोपडी या गावात खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील, आमदार जयकुमार गोरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर सभा पार पडली.



यावेळी बोलताना भाजपचे उमेदवार खा. रणजितसिंह निंबाळकर म्हणाले, २००९ साली देशाचे नेते शरद पवार माढा मतदारसंघात उभे राहतात म्हणून या तालुक्याचा विकास होणार मतदारसंघातील जनता हुरळून गेली होती. पाण्याचा प्रश्न पवार साहेब मिटवतील अशी शेतकऱ्यांना आशा होती. त्यावेळी सभेत पवारांनी मावळत्या सूर्याची शपथ घेवून सांगोला तालुक्याला दुष्काळमुक्त करतो, माढा लोकसभा मतदारसंघाची बारामती करेन, असा शब्द दिला होता. सूर्य देखील मावळला आणि पवार साहेब देखील मावळले पण सांगोल्याचा प्रश्न सुटला नाही. मात्र, लोकांच्या पदरी भोपळा मिळाला. पवारांनी पाण्याचा प्रश्न सोडविण्याऐवजी माढा मतदारसंघाचे हक्काचे पाणी बारामतीला पळवून नेले. पवार साहेबांचा जेवढा अनुभव आहे, तेवढं माझं वय देखील नाही. पवार साहेबांनी पाण्याचा शब्द पाळला नाही पण मी शब्द पाळला आहे.

माळशिरस मधले जे नेते मते मागत आहेत त्यांनी तालुका तापवला, तिकडे फाटे फोडायचे आणि सांगोल्यावर वेगळ्या पद्धतीने राग काढून त्यांनी २० वर्षे पाणी येवू दिले नाही. विकास कामांसाठी पैसे देतील का, मोहिते पुन्हा नीरा उजवा कालवा चालू देतील का? असा प्रश्न उपस्थित करून माणसं पाण्यावाचून मेली तरी मोहिते पाटील पाणी देणार नाहीत. मोहिते पाटील यांनी पतसंस्था, बँका, साखर कारखाने बुडवले, घोटाळे केले, तरी याचं पोट भरेना. पण यांची पिपाणी लोकं वाजवणार असल्याची टीका खा. रणजितसिंह निंबाळकर यांनी केली.

आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, रामायण, महाभारत संपेल पण मोहिते पाटील आणि शहाजीबापूंचा इतिहास संपणार नाही. मोहिते पाटलांनी ५० वर्षे सांगोला तालुक्याचं नीरा उजवा कालव्याचं पाणी अडवलं. गेल्या पाच वर्षात टेंभू, म्हैसाळ, नीरा उजवा कालवा या सिंचन योजनेचे पाणी आले आहे. ऐन उन्हाळ्यात कोयना धरणातून पहिल्यांदा माण नदीत सोडले आहे. पवारांना, विजयदादांना निवडून दिलं, पण काय काम केले ते दिसले नाही.

नीरा उजवा कालवा सिंचन योजनेतून एक टीएमसी पाणी वाढवून दिले आहे. ज्यांनी ५० वर्षे सांगोल्याला पाणी मिळू दिले नाही तेच मोहिते पाटील निवडणुकीत मते मागत आहेत. ५५ वर्षे भोगलेल्या दुष्काळाच्या झळा काळजात असतील तर या तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी विरोधकांच्या तुतारीची फुकारी केल्याशिवाय राहणार नाहीत अशी सडकून टींका आमदार शहाजीबापू पाटील यांनी केली.

यावेळी शिवसेना नेते भाऊसाहेब रुपनर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तानाजीकाका पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, राजश्री नागणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष मधुकर बनसोडे, भाजप तालुकाध्यक्ष अतुल पवार, दुर्योधन हिप्परकर, रयत क्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष भारत चव्हाण, उत्तम खांडेकर, मनसेचे विनोद बाबर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




'सुका'च होता पण पावसामुळे 'ओला' झाला!

कल्याण
257-42-147

मुंबई
489-11-470